पोलीस आयुक्तालय पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, पिंपरी चिंचवड-४११०३३
दुरध्वनी क्रमांक-२७३५०५५५

जा.क्र:-पो.आ./आस्था-२(१)/ अनुकंपा भरती २०२१ नियुक्ती आदेश /३०७०/२०२१, पिंपरी चिंचवड, दिनांक२८/०४/२०२१

संदर्भः- १. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.अकंपा-१२१९/प्र.क्र.५६/आठ, दि.१० जून २०१९
२.वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि ०४ मे २०२०
३. पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांजकडील परिपत्रक जा.क्र. पोमसं/६/२१/ अनुकंपा परिपत्रक/९५/२०२०, दि.०६/०७/२०२०
४. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३,दि३०जुलै २०२०
५.पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांजकडील परिपत्रक जा.क्र.पोमसं /६/२१/ अनुकंपा परिपत्रक/९५/२०२०, दि.०७/१०/२०२०
६.महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११

विषय — अनुकंपा तत्त्वावर पोलीस शिपाई पदी स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीबाबत..

---o---

## नियुक्ती आदेश

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या पोलीस शिपाई या पदाकरीता या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदाच्या प्रतिक्षासुचीवरील अनुकंपा तत्वावरील पोलीस शिपाई पदासाठी पात्र ठरलेल्या खालील नमुद पुरुष व महिला उमेदवारांची निवड माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार यांची वैद्यकिय तपासणी तसेच चारित्र्य पडताळणी व पूर्व इतिहास पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

त्याअनुषंगाने खालील उमेदवारांना पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड या घटकाचे आस्थापनेवर "पोलीस शिपाई/चालक पोलीस शिपाई (गट-क)" या संवर्गात महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अन्वये (१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दि.०१/०१/२०१९, (२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, अधिसूचना क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दि.३०/०१/२०१९ व (३) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०/०२/२०१९ नुसार (एस-७) रुपये २१,७००/- या मुळ वेतन व शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या इतर भत्त्यासह पोलीस मुख्यालय, अंकुश बोराडे शाळा, निगडी पोलीस स्टेशन जवळ, निगडी प्राधिकरण निगडी, पुणे- ४११०३५ येथे दि.०१/०५/२०२१ रोजी पासून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहुन अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रतिक्षा या.क्र. | उमेदवाराचे नाव | संपुर्ण पत्ता व भ्रमणध्वनी क्र. | जात/प्रवर्ग | भरती प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | ६ | तनिष संतोष झेंडे | पीसीएमटी चौक अंबिका कम्युनिकेशन जवळ गव्हाणे वस्ती भोसरी पुणे -३९<br>९५६१९६७०३३ | अ.जाती | अनुकंपा |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) सदरील नियुक्ती तीन वर्षाकरीता अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपाची राहील. तसेच विहित परिक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करावा लागेल. जर विहित संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

Scanned with CamScanner

२) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दिनांक १२/१२/२०११ अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात आलेली असल्याने, जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरित रद्द करण्यात येतील व महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० यातील तदतूदीनुसार कारवाई करण्यात येईल.

३) याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एस.एल.पी. दाखल करण्यात आली आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदरची नियुक्ती देण्यात येत आहे.

४) चारित्र्य व वर्तणूकीबद्दलच्या पडताळणीसाठीचा साक्षांकन नमुना फॉर्म भरतांना त्यामध्ये नमुद केलेली माहिती खरी (सत्य) असली पाहीजे. खोटी माहिती भरुन दिल्याचे पडताळणीमध्ये निदर्शनास आल्यास तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रे व जातीचे दाखले/ खेळाचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही खोटी माहिती असल्याचे आढळल्यास कोणतेही कारण अथवा नोटीस न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

५) प्रशिक्षण कालावधीत आपणास कोणत्याही प्रकारची इजा अगर दुखापत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. अथवा आपणास कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

६) प्रशिक्षण कालावधीत आपण दोषी आढळल्यास किंवा आपण गैरवर्तणूक केल्यास तसेच पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास/आढळल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिका-यांच्या पूर्व परवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास सेवा समाप्त करण्यात येईल.

७) नियुक्ती स्विकारल्यानंतर पदाचा राजीनामा दिल्यास पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

८) ज्या प्रवर्गातून/ संवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती करण्यात आली आहे तो प्रवर्ग/संवर्ग नंतर बदलता येणार नाही.

९) पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड घटकात पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर अन्य पोलीस घटकात आंतरजिल्हा बदलीसंदर्भात शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि.२६/१०/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

१०) पोलीस शिपाई पदावर रुजू झाले तारखेपासून तीन महिन्याचे आत आपणास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीआर-१०७९/२०५९/२२३/११, दि.२०/११/१९८० नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व बाबतचे विवरणपत्र स्वतःहून भरुन संबंधित आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

११) नियुक्ती नंतर आपणास पोलीस शिपाई पदास लागू असलेली महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/२००५ अन्वये दि.०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेतील नियुक्तीनंतर "नवीन परिभाषीत" अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१२) शासन निर्णय क्र.अकंपा/१०००/प्र.क्र.२०/२०००/०८, दिनांक २८/०३/२००१ अन्वये दिनांक ३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या दिवंगत कर्मचा-यांचे कुटुंबियांस अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवाराचे बाबतीत

Scanned with CamScanner

दि.२८/०३/२००५ चे शासन निर्णयान्वये तिसरे अपत्य झालेल्या उमेदवारास नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही.

१३) महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ दि.२६/०९/२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि/खर्च वसुली/२०१२/२२३१, दि.२६/०४/२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर तीन वर्षात पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास किंवा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवाराकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवारावर झालेला प्रशिक्षण खर्च प्रतिमहा रु.२०००/- प्रमाणे वसुल करुन सरकार जमा करण्यात येईल. याबाबतचे हमीपत्र आपणास देणे बंधनकारक आहे.

१४) पोलीस शिपाई पदावरील नियुक्ती ही निव्वळ अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्रमांक ७८ (१) (V) (VII) मधील तरतुदीनूसार आपली सेवा केव्हाही समाप्त करण्यात येईल.

१५) महाराष्ट्र पोलीस सेवा प्रवेश नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मूलभूत प्रशिक्षण आपणास पूर्ण करावे लागेल व सदर प्रशिक्षणामध्ये घेण्यात येणारी परिक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर आपण चार संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण केली नाही तर आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

१६) उमेदवार महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमांनुसार मराठी/हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

१७) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नियम १३ नुसार नियुक्ती दिलेल्या महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ व मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम आणि तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील.

१८) आपणास कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घेणे बंधनकारक राहील.

१९) शासन पत्र, गृहविभाग, क्रमांक आरसीटी-०३१२/प्र.क्र.२२८/पुनर्बांधणी-१६६/ पोल-५ अ, दि.११/०८/२०१६ अन्वये, तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशिक्षण/पो.शि.भरती/सेवाप्रवेश नियम-सुधारणा/३६/२०१६/ ४३९१, दि.०७/१०/२०१६ अन्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ (१)(ड) मध्ये केलेल्या सुधारित तरतूदीनुसार पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणा-या उमदेवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहन चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतू सदर परवाना धारण न करणा-या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल. जर आपण चालक शिपाई पदाचे कर्तव्य नाकारले तर आपला कुठल्याही पदासाठी नियुक्तीचा हक्क राहणार नाही. तसेच आपणास चालक प्रशिक्षण देण्यात येवून त्यांना चालकाचे कर्तव्यसुध्दा करावे लागेल.

२०) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणास उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी या कार्यालयाचे पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२१) पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. पोमसं/६/१०/पोशि/भरती/ सेवाज्येष्ठता/२५१/२०१२, दि.१७/०८/२०१३ अन्वयेचा स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतूदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

Scanned with CamScanner

२२) नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत अशा उमेदवारांनी त्यांच्या पूर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येईल.

२३) नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यासाठी आवश्यक त्या बाबींची फेर तपासणी केल्यास किमान विहित पात्रता आढळून येणे आवश्यक आहे. तसे नसल्यास कोणतेही कारण अथवा नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

२४) आपण सादर केलेले वारस प्रमाणपत्र भविष्यांत न्यायालयाने अवैध ठरविल्यास अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचे नावाने वारस प्रमाणपत्र दिल्यास आपली पोलीस शिपाई पदावरील नियुक्ती रद्द करुन, सेवासमाप्त करण्यात येईल.

२५) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी आपणाकडून दिवंगत अंमलदारावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत घेण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्यास अथवा कुटुंबातील अन्य सदस्यांनी तक्रार केल्यास चौकशीअंती आपणास सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा देणेत येईल.

२६) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम,२०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)नियम,२०११ या मुख्य नियमामधील नियम-१२ नंतर नियम १३ अंतर्भूत करण्यात आलेला असून, त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

२७) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १३ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपायांना मुंबई पोलीस नियमावली, १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवळी विहीत केलेले अन्य नियम लागु होतील.

२८) पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडपूण ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

२९) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ७४ नुसार नियुक्ती दिलेल्या महिला उमेदवार यांना कमीत कमी एक वर्षे सतत सेवा पुर्ण झाल्यानंतर प्रसुती रजेस पात्र राहतील.

३०) महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी. ६७/प्र.क्र. २०७/कार्या.१२, दिनांक २८/५/२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियम) नियमावली १९८२ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासुन ३० दिवसांचे आत संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल. व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणा-या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. याबाबतची या नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

26/04/2021

(रामनाथ पोकळे)
अपर पोलीस आयुक्त
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner

प्रति,

संबंधित अनुकंपा उमेदवार

मार्फत - राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पिंपरी चिंचवड

प्रत,

१) सहा.पोलीस आयुक्त, प्रशासन पिंपरी चिंचवड.

२) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पिंपरी चिंचवड .

२/- उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना पोलीस मुख्यालयात हजर करुन त्यांची नोंद आपल्या हजेरी पटावर करावी. नवप्रपोशि यांना सर्व किट सरंजाम किट पेटीसह अदा करावे. तसेच त्यांना स्टेट बँक ऑफ इंडीयामध्ये खाते उघडून खाते नंबर लेखा शाखेत सादर करण्याची समज द्यावी.

३) प्रमुख लिपिक, लेखा शाखा पिंपरी चिंचवड

२/- शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये दि.०१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने नप्रपोशि यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतंर्गत विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचे बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेवून प्रचलित नियमांप्रमाणे वेतन व भत्यांची आकारणी करावी.

४) संगणक कक्ष,पोलीस नोटीस प्रसिध्दकरीता,पोलीस आयुक्त कार्यालय पिंपरी चिंचवड .

| पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सुचना |
| --- |
| १. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेसकरीता रु.५०००/- ॲडव्हॉन्स भरणे आवश्यक असल्याने सदरची रक्कम येताना सोबत आणणे आवश्यक आहे. |
| २. हजर होणा-या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा.आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, बाड-बिछाना, जेवणासाठी आवश्यक साहित्य सोबत आणावे. |
| ३. बँक खाते, डी.सी.पी.एस./एन.पी.एस. खाते व सेवापट उघडणेसाठी ३०X ३० mm या साईजचे स्वत:चे फोटो, मूळ पॅन कार्ड व मूळ आधारकार्ड सोबत आणावे. |

Scanned with CamScanner